म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. वा
दा. क्र. २६११
दा. क्र. २६११
२६११

# महाराष्ट्राचा पोवाडा

कारेकर

IRBK-0102611
IRBK-0102611

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. २८०

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. ८१

हार

वाडा.

म. ग्रं. सं. ठाणें.
बा. वा. ८१
या. क्र. २६११



२६११

“ महाराष्ट्राची ‘ सदा सिद्ध ’ ख्याती ”

त कारकर

शिरशक २७४ ]

द्वितीयावृत्ति

IRBK-0102611
IRBK-0102611

**श्रीयुत प. स. देसाई म्हणतातः —**

श्रीयुत बी. व्ही. अुर्फ 'वासुदेवसुत' कारेकर यांनीं रचलेला **महाराष्ट्राचा पोवाडा** स्फूर्तिदायक असून भावना अुचंबळून आणणारा असा आहे. शिवाय यांत **प्रांतीय वास्तवता** यथातथ्य रीतीनें रेखाटली आहे. 'ती ही अमुची महाराष्ट्रभू प्यारी सुखकंद' आज कोणत्या रोगांनी जर्जर झाली आणि तो रोग दूर करण्याला काय केलें पाहिजे हें यथातथ्य रीतीनें सांगून 'जनजागृतीचा पडसाद' घुमवला आहे. अेकंदरीत हा पोवाडा गेय तर आहेच पण मननीयही आहे. २०।१२।४७.

---

# एकसंध व विक्रमशाली महाराष्ट्र

## निर्मिणाऱ्या श्री  छत्रपतींच्या

# संघटन-कुशलतेस

## सविनय समर्पण

---

'महत्त्व मजला कोण तुजमुळें'

**श्रीवाग्देवीच्या वरप्रसादानें, सन्मान्य साहित्यिकांच्या शुभाशीर्वादानें व सन्मित्रांच्या सदिच्छेनें आज हा 'महाराष्ट्राचा पोवाडा' रसिकचरणीं सादर करण्यास साभिमान संतोष वाटतों.**

'कोल्हापूर समाचार' मधून प्रथम हा पोवाडा महाराष्ट्र जनतेसमोर आणून मला अुत्तेजन दिल्याबद्दल करवीर सरकारचे भाषांतरकार व संयुक्त जनतासंबंधाधिकारी रा. सा. द. वि. टेंगशे, बी. अे., अेलअेल. बी. यांचा, तसेंच पोषक अभिप्रायाबद्दल प्रथितयश कादंबरीकार **श्री. प. स. देसाअी** यांचा मी अत्यंत ऋणी आहे. अितर संबंधी साहाय्यकांचाही मी आभारी आहे.

गीता जयंति
मार्गशीर्ष शु।। ११ शके १८६९
कोल्हापूर, ता. २३-१२-४७

लेखक व प्रकाशक,
बाबूराव वासुदेव कारेकर
(वासुदेवसुत)

म. ग्रं. सं. ठाणे.

# महाराष्ट्राचा पोवाडा

( चाल :- धन्य शिवाजी ०॥)

स्वतंत्रते देवते भगवती, मुजरा तुज करितों
तुझ्या लाडक्या महाराष्ट्राचा पोवाडा गातों ॥ धृ० ॥

महाराष्ट्राचें गीत तेंच तें स्वतंत्रता-गीत
महाराष्ट्राची स्वतंत्रतेची असे अेक जात
महाराष्ट्र नी स्वतंत्रता हीं भिन्न भिन्न नाहीं
महाराष्ट्राची स्वतंत्रतेची अेकसाथ ग्वाही
महाराष्ट्राच्या पवित्र भूमधिं स्वतंत्रास जन्म
महाराष्ट्राच्या माहात्म्याचें हेंच अेक मर्म
स्वतंत्रता--जयघोष सदोदित अिथ आनंदांत
स्वतंत्रतेचे निनाद घुमती कानाकानांत
स्वतंत्रता-पडसाद अुमटती हृदयाहृदयांत
स्वतंत्रतेचें रक्त सळसळे रोमारोमांत
परसत्ता वांकडी कराया नजर अिथें कचते
जुलमी सत्ता जाचक येथें क्षणभर नच टिकते
स्वतंत्रते देवते भगवती, मुजरा तुज करितों
तुझ्या लाडक्या महाराष्ट्राचा पोवाडा गातों ॥ १ ॥

सुरतेपासुनि कारवार तों मर्यादा जीची
सह्याद्री जिथ जाय मापण्या गगनाची अुंची

जिच्या नर्मदा, तापी शीर्षी अभिषेका करित
जीच्या तुंगा गोड जलानें पादतला धूत ...
श्रीरामांनी पदधूलीनें पावन जी केली
अगस्तिमुनिनें तपा योग्य भू म्हणुनी जी वरिली
दरीं डोंगरीं जेथें लेणीं दाविति पूर्व कला
पूर्वजवैभवस्मृतीहि ताजी करीत नव काला
कोंकण आणिक देश असति हे जिचे दोन हात
भात कोंकणीं, शाळु देशिं जी पिकवुनि पोषीत
भीमा, कृष्णा जिच्या शोभती मध्य-मेखलाच
शोभे गोदावरी जणूं ती ललाट-रेषाच

निर्झर झुळझुळ मंजुळ जेथें गाति शांतिपाठ
ज्ञानदेवतुकयादि अभविती जिथें भक्ति-पेठ
ठायीं ठायीं जिथें दैवतें जागृत हांकेला
भवानिचा वरदायि पहारा जेथें बसलेला
श्रीशिवरायें जेथें केली 'शहावरी मात'
राष्ट्रभक्तिची जिथें समर्थे चेतविली ज्योत
त्यागवृत्तिचा भगवा झेंडा उंच जिथें डोले
वैभवशाली जरिपटकाही मिरवत जिथ डोले

त्रिखंडकीर्ती-विक्रम जेथें मर्द मराठे ते
अफगाणां, थरकांप निजामा जे झाले करिते
सह्याद्रीचा कोट दडपवी अरि-छाती-कोट
भीमथडीचीं तट्टें पळविति अरितें वेहूट

'भित मराठी' अजून भिववी ती बंगाल्याला
सिंधुदुर्ग तो आळा घाली पर-चांचेगिरीला
कांदाभाकर खाउनि ठेवी रहाणीहि साधी
मराठमोळा भोळा चारी पुरुषार्थहि साधी

शुद्ध मराठी भाषा जिकी अमृतातें पैज
रसाळ तितुकी भावोद्दीपक, ओसंडे ओज
शक्तियुक्तिची भूमि गाजली चारी मुलखांत
बुद्धि, श्रद्धा समान वांटा जिथ हातोहात
अंकीं, स्कंधीं जिच्या विहरतों आम्ही स्वच्छंद
ती ही अमुची महाराष्ट्र-भू प्यारी सुखकंद

स्वतंत्रते देवते भगवती, मुजरा तुज करितों
तुझ्या लाडक्या महाराष्ट्राचा पोवाडा गातों ॥ २ ॥

तीच महाराष्ट्र-भू बुजबुजे आज बखेड्यांनीं
मतमतांतरीं, द्वेषमत्सरीं पुरती ग्रासूनी
राजकारणीं, धर्मकारणीं वाद किती शिरले
माणुसकीसहि लोक पारखे हाय! कसे झाले?
श्वानमांजरें जवळ करूनी, अस्पृश्यां दूर—
लोटुनि करिती मानव्याचा हा! चक्काचूर
बरोबरीची सर्वतोपरीं स्त्रीजातहि असतां
तुडवुनि पदतलिं सदा घालिती तिज बुक्क्या, लाथा
शिवरायासम शूर जन्मती वंद्य जिच्या पोटीं
स्वतां बनूनी नीच दाविती कशी तिला काठी?
ज्या त्या बाबीविषयीं चाले किति वादावादी
येंअि त्यामुळें कसें कळेना प्रगतीला मंदी
अैक्यभावना लोप पावली विचारआचारीं
संघटनेला खोट पाडिते ही दावेदारी
विचार करुनी अेकजूट व्हा, बंधूनो, या, या
नजर वांकडी करावया मग कोणाची माया?

स्वतंत्रते देवते भगवती, मुजरा तुज करितों
तुझ्या लाडक्या महाराष्ट्राचा पोवाडा गातों ॥ ३ ॥

संघटनेचा त्रिगुल वाजला, या, या; या पुढती
दावा जगता महाराष्ट्राची ' सदा सिद्ध ' ख्याती
कर्तव्याची जाणिव ठेवा, कर्तबगारीची—
शीघ लागुं द्या प्रसंग ओळख जबाबदारीची
बेहिंमत ना बना बंधुनो, आळस झिडकारा
अुठा, अेक व्हा, लागा कार्या; जिरवा अरि--तोरा
सावध शत्रू, आपण गाफिल नको असें व्हाया
बुद्धिमंत मित्रहो, हवें का तुम्हां सांगाया
कांपविलें चळचळां, चरचरां कंठनाळ चिरिले
काय विसरले शिखानष्ट ते भ्रष्ट लुंगिवाले ?
सह्याद्रीचा सिंह, जंबुका काय भीक घाली
दिल्लीशा जो नाचवीत करतलीं विजयशाली
मराठभाला नाहीं झाला बोंथट तो अजुनी
प्रसंग येतां खड्ग मराठी दावीलचि पाणी
वृथा वल्गना अितरांच्या कधिं नच चालूं देअी
जात मराठी महाभिमानी नच खपवुनि घेअी
स्वतां कुरापत काढायाचा नसे मुळीं बाणा
आला शत्रू प्रतिकाराया समर्थ परि जाणा
अमुचें नाहीं हाडवैर कधिं यवन--अिंग्रजांशीं
शांत मनानें मित्रपणानें वागतील त्यांशीं
तरी मित्रहो, त्वरें अेक व्हा, अेकदिलें वागा
मतें असोतचि भिन्न, कारणीं देशाच्या लागा
हांक घालितां जागे खडकन् अेकजात व्हावें
अेका छत्राखालीं सत्वर सर्वांनीं यावें
नसेल ज्याचें ज्ञान त्वरित घ्या शिकुनि तें शास्त्र
मुख्य मंत्र हा अेकदिलानें होअूं अेकत्र

आज लढाऊ रीत निराळी कळेल शिकतांना
शस्त्रें अस्त्रें वेगवेगळीं उपलब्धचि नाना
प्रसंग सुचवी मार्ग नित्य हा दावा देवाचा
ठेवा त्यावरि भाव, दाविलचि पथ सन्मानाचा
स्वतंत्रते देवते भगवती, मुजरा तुज करितों
तुझ्या लाडक्या महाराष्ट्राचा पोवाडा गातों ॥४॥

थाप डफावरि पडे शाहिरी, बंद बंद तुटती
स्फूर्ति संचरे, ओंठ थरथरे, बाहू फुरफुरती
पोवाड्याचा थाट असा मम जरी नसेल, नसो
प्रभाकराची[३] जडणघडण वा जरी न यांत दिसो
महाराष्ट्राचे गाति पवाडे, गातिल शाहीर
अल्पमतीचा त्यांतच माझा मिळवी मी सूर
कलापूर्ण तें गाती सुंदर गीत श्रीपाद[४]
रामगणेशें[५] त्यांत मिसळला कणखर निज साद
तुळजापुरकर[६] भावभक्तिचा करिती अनुवाद
'वासुदेवसुत' जनजागृतिचा घुमवी पडसाद
स्वतंत्रते देवते भगवती, मुजरा तुज करितों
तुझ्या लाडक्या महाराष्ट्राचा पोवाडा गातों ॥५॥

१ मराठे वीरांच्या धडकीनें बंगाली लोकांनीं खंदक म्हणून बांधलेला तट सुप्रसिद्ध आहे. २ नरवीर महादजी शिंदे यांनीं बहादूरशहाला दिल्लीच्या तक्तावर बसविलेलें अितिहासज्ञांस विदीत आहेच. ३ पेशवाअींतील तडफदार शाहीर ४ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ५ सुप्रसिद्ध कवि 'गोविंदाग्रज' गडकरी ६ दत्तो आप्पाजी तुळजापुरकर

अ. नं. ४, ५ व ६ यांचीं 'महाराष्ट्र गीतें' सर्वतोंमुखीं झालीं आहेत.

ग्रं. सं. ४३०९ ६१००k...

## वाचनीय कादंबऱ्या

सौ. रेखा कि. २॥ रु.

मर्दाची माअुली (छापत आहे)

**करवीर गौरव प्रकाशन-कोल्हापूर**

## कारेकरांचीं पुस्तकें

### प्रकाशित

| | |
|---|---|
| * प्रेमपराग (अनेक कवींच्या कवनांचा संग्रह) | ०-८-० |
| * मधुसंचय ( ,, ) | ०-६-० |
| * शतोपदेश (संस्कृत-मराठी) | ०-४-० |
| * मराठी शतोपदेश | ०-१-६ |
| ताराबाअीचा पोवाडा | ०-०-६ |
| § बालध्रुव (मुलांसाठीं नाटक) | ०-१-० |
| § शहाजीवर मात ( ,, ) | ०-१-० |
| * अमरकुमार (छोटीं चरित्रें) | ०-२-० |
| महाराष्ट्राचा पोवाडा (द्वितीय आवृत्ति) | ०-२-० |

* 'भारत कवि मंडळ' मार्फत § दासराम बुकडेपोमार्फत

### आगामी

अमर कुमार भाग २ रा (गोष्टी) विद्याग्रहण (प्रहसन) अमर महिला (चरित्रें) हृदयकमल (कवितासंग्रह) संगर गीतें (तडफदार गीतांचा संग्रह) जलाल जहर (पांच अंकी नाटक) स्वराज्य-सोपान (पांच प्रहसनें) शिलालेख (कै. सौ. सुशिलाबाअी कारेकर-'राधा-तनया' यांचें लघुकथा, कविता वगैरे गद्यपद्यलेखन)

पत्ता-(१) प्रोप्रायटर '**रामकृष्ण कार्यालय,**' मार्केट कोल्हापूर.

(२) श्रीयुत **बी. व्ही. कारेकर,** गव्हमेंट प्रेस, कोल्हापूर.

Kolhapur : Printed ... ess.

२६११
IRBK-0102611
IRBK-0102611